MHND170001582026

**<u>दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, हिमायतनगर, जि. नांदेड</u>**

(पीठासिन अधिकारी श्री. झेड. झेड. कादरी)

**<u>किरकोळ दिवाणी अर्ज (न्यायिक चौकशी नंबर) २२/२०२६.</u>**

**निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश**

| | | |
|---|---|---|
| ०१. | **शालीनी भ्र. पांडुरंग आडबलवाड**<br>वय. ५१ वर्षे, धंदा. घरकाम | **अर्जदार** |
| ०२. | **शिवशंकर पि. पांडुरंग आडबलवाड**<br>वय. ३५ वर्षे, धंदा. नौकरी | |
| ०३. | **शैलेंद्र पि. पांडुरंग आडबलवाड**<br>वय. २५ वर्षे, धंदा. नौकरी | |
| ०४. | **शुभांगी पि. पांडुरंग आडबलवाड**<br>वय. २९ वर्षे, धंदा. घरकाम<br>वरील सर्व रा. सरसम बु., ता. हिमायतनगर, जि. नांदेड | |
| | ***विरुध्द*** | |
| ०१. | निरंक. | **गैरअर्जदार** |

**०१.** प्रस्तुत अर्ज अर्जदार क्र.०१ चे पती व अर्जदार क्र.०२ ते ०४ यांचे वडील नामे मयत 'पांडुरंग शंकरराव आडबलवाड' यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता 'मुंबई नियमन कायदा, १९२७' चे कलम ०२ आणि ०३ प्रमाणे अर्ज दाखल करुन अर्जदारांना वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणुन दाखल केला आहे.

**०२.** अर्जदारांनी त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.०१ चे पती व अर्जदार क्र.०२ ते ०४ यांचे वडील नामे मयत 'पांडुरंग शंकरराव आडबलवाड' हे दिनांक २०/०१/२०२६ रोजी मौजे सरसम बु., ता. हिमायतनगर, जि. नांदेड येथे मयत झाले. त्यांना अर्जदार क्र.०१ ते ०४ हेच कायदेशीर वारस आहेत. तसेच अर्जदार क्र.०१ चे पती व अर्जदार क्र.०२ ते ०४ यांचे वडील नामे 'पांडुरंग शंकरराव आडबलवाड' मयत झालेले आहेत हे दर्शविण्याकरीता सार्वजनिक आरोग्य विभाग, महापालिका नांदेड यांचे मृत्यू प्रमाणपत्र दिनांक २१.०२.२०२६ च्या निशाणी क्र.०५ सोबत दाखल केलेले आहे. अर्जदार यांना खाजगी व शासकीय कामाकरीता वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**०३.** अर्जदारांनी त्यांच्या कथनांच्या पुष्टयर्थ अर्जदार यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रमांक १२ येथे दिले आहे. पुराव्या मध्ये त्यांनी अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली असुन अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत विनंती केली आहे.

**०४.** प्रस्तुत प्रकरणात दिनांक २१/०२/२०२६ रोजीच्या निशाणी क्र.०१ वरील पारित आदेशान्वये दैनिक 'श्रमिक एकजूट' या वर्तमानपत्रात दिनांक ०३/०३/२०२६ रोजी निशाणी क्रमांक ११ वरील जाहीर प्रकटन प्रसिध्द करणेत आले होते व त्या अनुषंगाने सदर वारस प्रमाणपत्रा करिता जाहिर आक्षेप मागविण्यात आले. असे असले तरी जाहीर प्रकटनाचे उत्तरात अद्याप न्यायालया समोर कोणतेही/कोणाकडुनही आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

**०५.** अर्जदारांनी अर्जाच्या पुष्टयर्थ अर्जदारांचे आधार कार्ड, मयत 'पांडुरंग शंकरराव आडबलवाड' यांचे मृत्यु प्रमाणपत्र, दाखल केले आहे. अर्जदारांचे कथन व त्यांनी दिलेला तोंडी पुरावा व दाखल कागदपत्रीय पुरावा यावरुन असे दिसून येते की, अर्जदार हेच मयत 'पांडुरंग शंकरराव आडबलवाड' यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांच्या नावाने वारस प्रमाणपत्र

देण्यात कोणतीही अडचण नाही, असे दिसुन येते. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

## आ दे श.

०१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो. अर्जदार क्र.०१ ते ०४ हेच मयत 'पांडुरंग शंकरराव आडबलवाड' यांचे वारस असल्याचे घोषीत करण्यात येते.

०२. वारसाचे प्रमाणपत्रासाठी आवश्यक ते न्यायालयीन शुल्क जमा केल्या नंतर वारसा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SYED ZAMEER AHEMAD SYED ZAHOOR AHEMAD QUADRI
Date: 2026.06.10 16:36:12 +0530

**हिमायतनगर.**

दिनांक : १० जून २०२६.

(झेड. झेड. कादरी)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**हिमायतनगर.**

**CERTIFICATE**

| | |
|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order. | |
| Name of the Stenographer | N.K.Hingmire |
| Court Name | Court of CJJD & JMFC,<br>Tq. Himayatnagar.<br>Dist. Nanded |
| Judgment signed by the Presiding Officer on | 10.06.2026 |
| Judgment/Order uploaded on | 10.06.2026 |